पोलीस अधीक्षक, कार्यालय गडचिरोली
जनसंपर्क शाखा
P.R.O Office, Gadchiroli
**Phone No.** 07132223142 **Address:** SP Office,Gadchiroli
**E-mail** : prospoffice.gadchiroli@gmail.com

# वार्तापत्र

**दिनांक: २७/०३/२०२०**

## संचारबंदीच्या काळात विनाकारण घराबाहेर पडणाऱ्यांना गडचिरोली पोलीस दलाचा दणका

- वाहनांवर मोपका अंतर्गत कार्यवाही, ८१,७००/- रुपयांचा दंड वसुल
- संचारबंदीचे पालन करण्याचे मा.पोलीस अधीक्षकांचे आवाहन.

कोविड-१९ साथीच्या रोगाच्या पार्श्वभुमीवर संपुर्ण महाराष्ट्रात संचारबंदी लागु असतांना गडचिरोली जिल्ह्यात काही बेजबाबदार नागरीक संचारबंदीचे उल्लंघन करत हुल्लडबाजी करण्यासाठी घराबाहेर पडत आहेत. अशा बेजबाबदार नागरीकावर गडचिरोली पोलीस दलाने जिल्हाभरात कार्यवाहीचा बडगा उचलला असुन संचारबंदीच्या काळात जिल्हाभरात आजपर्यंत एकुण ३२२ वाहनांवर मोटार परिवहन कायद्याअंतर्गत कार्यवाही करण्यात येवुन एकुण ८१,७००/- रुपयाचा दंड वसुल करण्यात आला आहे.

संचारबंदीच्या काळात जनतेला जीवनावश्यक साहित्याची अडचण भासू नये यासाठी शासनाने जीवनावश्यक साहित्याची सेवा देणाऱ्या केंद्राना सुट दिलेली आहे. परंतु काही बेजबाबदार नागरीक काहीएक कारण नसतांना शहरात फिरतांना आढळुन आल्याने त्यांच्यावर वचक बसविण्यासाठी गडचिरोली पोलीस दलाकडुन कठोर कार्यवाही करण्यात येत आहे.

कोविड-१९ साथीच्या रोगाच्या पार्श्वभुमीवर महाराष्ट्रात लावण्यात आलेल्या संचारबंदीचे सर्व नागरीकांनी पालन करणे आवश्यक असतांना काही बेजबाबदार नागरीक अत्यावश्यक सेवेशिवाय केवळ हुल्लडबाजी करण्यासाठी बाहेर पडणार असतील तर त्यांच्यावर कडक कार्यवाही करण्याचे निर्देश मा. पोलीस अधीक्षक श्री. शैलेश बलकवडे सा़ो. यांनी जिल्हाभरातील पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना दिले असून संचारबंदीच्या काळात नागरीकांनी प्रशासनाला सहकार्य करावे असे आवाहन जनतेला केले आहे.